Gomantak

# 'कॅनरा एचएसबीसी'च्या व्यवसायात ८२ टक्के वाढ

पणजी, ता. २५ : 'कॅनरा एचएसबीसी ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स इन्शुरन्स 'कंपनी लिमिटेड'ने आर्थिक वर्ष २०१०-२०११मध्ये व्यवसायात भरघोस ८२ टक्के विक्रमी वाढ मिळवली आहे.

बँक अॅश्युरन्स माध्यमातून या कंपनीने मार्चमध्ये २६५ कोटी रुपये उत्पन्न मिळवले असून आर्थिक वर्ष संपताना ग्रॉस रिटर्न प्रिमिअमचे एकूण उत्पन्न १५६२ कोटी रुपयांपर्यंत पोचले आहे. कंपनीने गेल्या आर्थिक वर्षात १,११,०००हून अधिक पॉलिसी विकल्या आहेत. कामकाजाला सुरवात केल्यापासून तीन वर्षांतच नव्या व्यवसायापासून उत्पन्न मिळवणाऱ्या आघाडीच्या दहा खासगी विमा कंपन्यांत 'कॅनरा एचएसबीसी ओरिएंटल'ला मनाचे स्थान मिळाले आहे. एवढेच नव्हे तर सर्व खासगी विमा कंपन्यांत १३ महिन्यांतील सर्वाधिक सातत्य प्रमाण (पर्सिस्टन्सी रेशो) राखण्यात ही कंपनी यशस्वी ठरली आहे.

यासंदर्भात कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जॉन होल्डन म्हणाले, की वितरणाचे कार्यक्षम बँक अॅश्युरन्स प्रारूप, उच्च दर्जाची विक्री, ग्राहकांचा विश्वास आणि भागधारक व कर्मचाऱ्यांची बांधिलकी या जोरावर आमच्या कंपनीने सातत्यपूर्ण प्रगती केली आहे. गेले आर्थिक वर्ष लक्षणीय नियामक बदलांचे असतानाही कंपनीने स्वतःला एक भक्कम खासगी आयुर्विमा कंपनी म्हणून प्रस्थापित केले आहे. ग्राहकांचा व्यापक संशोधन अभ्यास केल्यानंतर मिळालेल्या प्रतिसादाच्या आधारेच आम्ही आमच्या योजनांची रचना केली आहे. संघटित वित्तीय सेवांपासून अद्याप वंचित असणाऱ्या ग्रामीण लोकसंख्या, सामाजिक क्षेत्र व आर्थिक दुर्बळ गटांना गरजेनुरूप व किफायतशीर विमा योजना देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

ते पुढे म्हणाले, की बँक अॅश्युरन्स प्रारुपाद्वारे आम्ही ग्रामीण भागाशी जवळीक वाढवली आहे. कॅनरा बँक, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि एचएसबीसी इन्शुरन्स (एशिया पॅसिफिक) होल्डिंग्ज लिमिटेड या प्रमुख वितरक संस्थांप्रमाणेच आम्ही प्रगती ग्रामीण बँक (कर्नाटक), श्रेयस ग्रामीण बँक (उत्तर प्रदेश) व साऊथ मलबार ग्रामीण बँक (केरळ) या तीन प्रादेशिक ग्रामीण बँकांसमवेत सहयोग केला आहे. त्यामुळेच ग्रामीण भागातून मिळणाऱ्या पॉलिसींच्या संख्येत गेल्या आर्थिक वर्षात २३ टक्के वाढ दिसून आली आहे. या आर्थिक वर्षात आम्ही वितरक बँकांच्या ग्राहकांना मदत करण्यासाठी आमच्या विमा योजनांचा संग्रह विस्तारण्यावर भर देणार आहोत.